

# चैतन्य लहरी

नोव्हेंबर – डिसेंबर २००७

अंक क्र. ११/१२



# दिवाळी पूजा दि. १० नोव्हेंबर २००७













## अनुक्रमणिका


- निर्मल प्रेम आश्रम, एन.जी.ओ. श्रीमाताजी निर्मलादेवींची भेट (वृत्तांत), दिनांक २२ नोहेंबर २००७ ........................ २
- दिवाळी पूजा २००७, दिल्ली (वृत्तांत) ........................ ३
- श्रीमाताजींबरोबर संगीतमय रात्र, दिवाळी पूजा, १० नोहेंबर २००७ ........................ ५
- नवरात्रीच्या कालावधीतील श्रीमाताजींची साकार/निराकार स्वरूपात झालेल्या पूजेचा (वृत्तांत) ........................ ७
- ख्रिसमस पूजा, प. पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण, गणपतीपुळे-२००२ ........................ ११
- सहस्रार चक्र ........................ १४
- विश्व-निर्मला-धर्म ........................ १६
- अहंकार ........................ १७
- गुरू-पूजा, प.पू.श्रीमाताजींचे भाषण, मुंबई १९७२ ........................ १८
- विवाहापूर्वी नवरदेवांना श्रीमाताजींचा उपदेश, गणपतीपुळे दि. २९ डिसेंबर २००२ ........................ २०


सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, सहजयोगातील कॅसेट,सी.डी., पुस्तके, मासिके,श्रीमाताजींचे फोटो, कॅलेंडर, चैतन्यलहरी मासिके, श्रीमाताजींची पेंडॉल्स, इ. साहित्य भारतभरातील वितरण व विक्री व्यवस्था, **"निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे"** या कंपनीमार्फत होत आहे. तरी सर्व सहजयोग्यांना कळविण्यात येते की, **निर्मल ट्रान्स्फॉर्मेशन प्रा.लि.पुणे**. या कंपनीच्या लेखी परवानगी शिवाय वरील साहित्याची निर्मिती तसेच परस्पर विक्री कुणीही करू नये. तसे केल्यास त्याची जबाबदारी संबंधित सहजयोग्यावर व लिडरवर राहील.

तसेच चैतन्य लहरी मासिकाचे सन २००८ सालासाठी नवीन सभासदत्व घेण्यासाठी धनादेश पाठविताना तो " NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD." या नावाने पाठविताना पाकिटावर चैतन्य लहरी (मराठी) लिहिणे आवश्यक आहे. सभासदांची वार्षिक वर्गणी मागील वर्षाप्रमाणेच अंक हातपोच घेणाऱ्यांसाठी रुपये २००/- व पोष्टाने मागविणाऱ्यांसाठी रुपये २२५/- एवढी ठेवली आहे. तसेच परगांवच्या सहजयोग्यांनी शक्य झाल्यास ग्रुप बुकिंग केल्यास अंक पोष्टाने पाठविताना सोईचे होईल. कंपनीचा पत्रव्यवहाराचा पत्ता पुढीलप्रमाणे आहे.

NIRMAL TRANSFORMATION PVT. LTD.

BLDG NO. 8, CHANDRAGUPT HSG SOC. PAUD ROAD,

kOTHRUD, PUNE 411 O38. TEL. 020 25286537

# निर्मल प्रेम आश्रम, एन.जी.ओ. श्रीमाताजी निर्मलादेवींची भेट (वृत्तांत)
## दिनांक २२ नोव्हेंबर २००७

आज दिनांक २२ नोव्हेंबर २००७ रोजी श्रीमाताजींनी एन.जी.ओ. च्या आश्रमाला भेट देऊन सर्व अनाथ मुलांना आशीर्वाद दिले. श्रीमाताजी एन.जी.ओ.मध्ये आल्यानंतर सर्व मुलांनी श्रीमाताजींना ओवाळून आगतम स्वागतम या भजनावर नृत्य करीत स्वागत केले. त्यावेळी तेथील सर्व मुले/मुली, विधवा तसेच सर्व कर्मचारी वर्ग आदी सर्वजण अतिशय आनंदीत झाले होते.

श्रीमाताजींच्या आगमनाच्या प्रवेशद्वारावर रांगोळ्या व फुलांची आरास केली होती. श्रीमाताजींना आश्रमाच्या मधल्या हॉलमध्ये घेऊन जाताना खाली गुलाबाच्या पाकळ्याचा गालिचा तयार केला होता. सदर आश्रमाची स्थापना श्रीमाताजींनी अनाथ मुलांसाठी व निराधार मुलांसाठी केली असून आजच्या त्यांच्या भेटीच्या वेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य व आनंद जाणवत होता.

श्रीमाताजींनी पाढऱ्या रंगाची साडी परिधान केली होती. एक फिकट रंगाची शाल घेतली होती.श्रीमाताजींच्या आगमनामुळे सर्व मुलांना आदिशक्ती प्रेम, करुणा , आनंद बरोबर घेऊन आल्याचे भासत होते. सर्व मुलांचे चेहरे आनंदाने चमकत होते. सर्व मुले आदर्श सहजयोगी दिसत होती. प्रत्येकजण श्रीमाताजींच्या समोर त्यांच्या जवळ बसण्याचा प्रयत्न करीत होता. साधारण १०० जणांची उपस्थिती होती. त्यावेळी श्रीमाताजींच्या समोर लहान मुलांनी व युवाशक्तीच्या मुलांनी अनेक भजने सादर केली. श्रीमाताजी प्रत्येक गाण्यानंतर सर्व मुलांचे कौतुक करीत होत्या. तसेच श्रीमाताजींच्या समोर नृत्य सादर केले त्याचेही श्रीमाताजींनी खूप कौतुक केले.

त्यानंतर श्रीमाताजींनी स्वत: संपूर्ण आश्रमाची पहाणी केली. त्यावेळी त्यांना आश्रमाचे कार्य कसे चालते ते सांगितले. एनजीओ मध्ये मुले दत्तक कशी घेतात हे सांगितले. श्रीमाताजींनी एनजीओ मध्ये काम करीत असलेल्या सर्वांचे मनापासून कौतुक केले. त्यावेळी श्रीमाताजींनी सर्व मुलांना विचारले की, 'तुम्हाला एनजीओतील सर्वात जास्त कुठली गोष्ट आवडते.' सर्व मुलांनी उत्तर दिले की, 'जेवण आई' हे ऐकून श्रीमाताजींचे हृदय करुणेने व आशीर्वादाने भरून वाहत होते. त्यांच्या प्रसन्न व समाधानाने हसण्यातून त्यांचे स्वप्न पूर्ण झाल्याचे जाणवत होते.

त्यानंतर, एनजीओ च्या मुलांनी तयार केलेली गिफ्ट श्रीमाताजींना देण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींना सीता या भारतीय टिमने तयार केलेली एनजीओ निर्मल प्रेम वेबसाईट दाखविण्यात आली. संपूर्ण साईट पाहून झाल्यावर श्रीमाताजींनी सर्वांचे कौतुक केले.त्यावेळी बाजूला सहा लहान कुत्र्यांच्या पिलांना घेऊन लहान मुले बसली होती. त्या कुत्र्यांच्या पिलांवरील लहान मुलांचे प्रेम पाहून श्रीमाताजींना फार आनंद वाटला. त्यानंतर श्रीमाताजी म्हणाल्या की, अशाच एक एनजीओ मुंबई मध्ये असायला हवा, त्यानंतर परत म्हणाल्या की अशाच आश्रमाची पुण्यात स्थापना करायला हवी. त्यावेळी एनजीओच्या सेक्रेटरी श्रीमती किरण वालिया यांनी सांगितले की, आपल्या आशीर्वादाने ही इच्छा आम्ही तुमची मुले पूर्ण करू.

श्रीमाताजी साधारण ४.०० च्या सुमारास परत निघाल्या त्यावेळी बाजूला लहान मुले हातात ती कुत्र्याची पिले घेऊन उभी होती. त्यांच्याकडे पाहून श्रीमाताजींनी यातील दोन पिले गाडीत ठेवायला सांगितली. त्यांनी सांगितले ही पिले प्रतिष्ठानला पाळण्यात येतील. त्यावेळी सर्व मुलांची धांदल उडाली त्यांनी त्यातील जास्तीत जास्त सुंदर असणारी दोन पिले आनंदाने श्रीमाताजींच्या गाडीत ठेवली.

त्यानंतर श्रीमाताजी गाडीत बसल्या त्यावेळी बाजूला एक सहजयोगीनी एका लहान एक महिन्याच्या मुलाला घेऊन उभी होती. तिने श्रीमाताजींना या लहान मुलाचे नाव ठेवण्याबाबत विनंती केली .श्रीमाताजींनी त्याचे नाव 'सहज' म्हणून सांगितले. परत एकदा सर्वांना आशीर्वादीत करून श्रीमाताजी परतल्या.

● ● ●

# दिवाळी पूजा २००७, दिल्ली (वृत्तांत)

दिवाळी पूजा दिनांक ९,१०,११ नोव्हेंबर रोजी दिल्ली येथे आयोजित करण्यात आली होती. पूजेसाठी जगभरातून सहजयोगी आले होते. पूजेसाठी येणाऱ्या सहजयोग्यांची अतिशय चांगली व्यवस्था केली होती. सर्वांना कुंकू, अत्तर लावून, गुलाबाचे फूल देऊन स्वागत करून त्यावेळी प्रत्येकाला सुक्या मेव्याचे छोटेसे पाकिट देण्यात येत होते. बाजूलाच चहा व थंड पेयाची व्यवस्था केली होती. सर्व सहजयोग्यांना पेंडॉलपर्यंत पोहचविण्यासाठी गाडीची तसेच व्हॉलेंटियर्सची व्यवस्था केली होती.

## दिनांक ९ नोव्हेंबर २००७

आज सकाळी ६.०० वा. सामूहिक ध्यान तीन महामंत्रांनी सुरू झाले साधारण तासाभराने ध्यान संपले. त्यानंतर सर्वजण सकाळचा नाश्ता घेऊन हवनाच्या ठिकाणी जमले. हवन दुपारी १.०० च्या सुमारास संपले. त्यानंतर सर्वजण दुपारच्या जेवण व विश्रांतीसाठी गेले.

दुपारी ४.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये भजनाच्या कार्यक्रमाची सुरवात झाली. त्यामध्ये लहान मुलांच्या कार्यक्रमापासून ते सहजयोगातील गायकांच्या बहारदार गायनाच्या कार्यक्रमासारखे अनेक गाण्याचे कार्यक्रम झाले रात्री ११.०० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

## दिनांक १० नोव्हेंबर २००७

आजच्या कार्यक्रमाची सुरवात सकाळी ६.०० च्या सामूहिक ध्यानाने झाली. त्यानंतर दुपारी ४.०० च्या सुमारास मुख्य पेंडॉलमध्ये एकत्र जमले. त्यामध्ये सुब्रमण्यम, धनंजय धुमाळ यांनी अनेक गाणी सादर केली. बाजूला फटाक्यांची आतषबाजी चालू होती. सर्वत्र अतिशय प्रसन्न वातावरण होते. थोड्या वेळात श्रीमाताजींचे स्टेजवर आगमन झाले. श्रीमाताजींना ओवाळण्यात आले. त्यावेळी सर्वांनी उभे राहून आगत स्वागत गीत म्हटले. श्रीमाताजींनी सर्वांना खाली बसण्यास सांगितले. त्यावेळी लहान मुलांनी श्रीमाताजींच्या समोर हे गिरी नंदिनी या भजनावर नृत्य सादर केले. त्यावेळी श्रीमाताजी टाळ्या वाजवून कौतुक करीत होत्या. त्यानंतर महालक्ष्मी अष्टकम् या भजनावर नृत्य सादर केले. त्यावेळी श्रीमाताजी स्वत: निर्मलांजलीमधील भजने पहात होत्या.

श्रीमाताजींच्या समोर माईक ठेवण्यात आला. श्रीमाताजीं सर्वांना प्रथम **हॅपी दिवाली** म्हटल्या. त्यावेळी सर्वांनी प्रचंड टाळ्या वाजविल्या. त्यानंतर श्रीमाताजींनी साधारण एक तासभर भाषण केले. त्यानंतर बराच वेळ भजनाचा कार्यक्रम झाला. त्यावेळी सर्वजण आनंदाने नाचत होते. त्यानंतर रात्री जेवणाच्या वेळी सर्वांना प्रसाद व पुस्तक भेट दिले.

## दिनांक ११ नोहेंबर २००७

आजच्या पूजेच्या दिवसाची सुरवात सकाळी ६.०० वा सामूहिक ध्यानाने झाली. त्यावेळी श्रीमाताजींच्या भाषणाची कॅसेट लावली होती. दुपारी २.०० पासूनच सर्वजण पूजा पेंडॉलमध्ये जमले होते. त्यानंतर दुपारी ३.०० पासून भजनाचा कार्यक्रम सुरू झाला. त्यावेळी अनेक पुजेतील भजने सादर झाली. रात्री ८.०० च्या सुमारास श्रीमाताजींची निराकार स्वरूपात पूजा सुरू झाली. त्यावेळी प्रथम तीन महामंत्र त्यानंतर गणपती अथर्वशीर्ष, बिनती सुनिये, निर्मला किती वर्णावी तुझी ग स्तुती, विश्ववंदीता, ही भजने झाल्यावर शेवटी मुखिरामजींनी भजने सादर केली. त्यावेळी सर्वजण बेहोष होऊन नाचत होते. एवढ्या प्रचंड संख्येने सर्वांनी श्रीमाताजींच्या निराकार स्वरूपातील पूजेचा

आनंद घेतला. पूजेच्या वेळी सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. श्रीमाताजींसमोर साकार स्वरूपात असल्यासारखे भासत होते. रात्री १.०० च्या सुमारास कार्यक्रम संपला.

नॉयडातील प्रचंड मोठ्या जागेत पूजेची व्यवस्था अतिशय सुंदर केली होती. सर्वत्र प्रचंड विद्युत रोषणाई केली होती. त्याकडे पहाताना सर्वत्र दिवाळीचे दिवे लावल्याचा भास होत होता. स्टेजवर सुंदर डेकोरेशन केले होते. जेवण्याची, पाण्याची, नाश्टयाची खूपच सुंदर सोय केली होती. बाहेरच्या सहजयोग्यांना मोबाईल चार्ज करण्यासाठी अनेक ठिकाणी व्यवस्था केली होती. तसेच सर्वत्र एल.सी.डी टीव्ही लावले होते. सर्व सहजयोग्यांकडे सतत जातीने लक्ष दिले जात होते.

सर्व सहजयोगी श्रीमाताजींनी साधारण तासभार केलेली अमृतवाणी व त्यावेळचे श्रीमाताजींचे दर्शन आठवत आपल्या घराकडे आनंदाने निघाले.

● ● ●

## श्रीमाताजींचे भारतातील आगमन - २६ ऑक्टोबर २००७

शुक्रवार दिनांक २६ ऑक्टोबर रोजी रात्री १०.०० वा. बऱ्याच कालवधीनंतरच्या प्रतिक्षेनंतर आदिशक्तीची मुले श्रीमाताजींच्या प्रिय दर्शनाने अंतरराष्ट्रीय टर्मिनल येथे पुन्हा एकदा आशीर्वादीत झाली.यावेळी दिल्ली व परिसरातील जवळ जवळ १००० लहान- मोठे सहजयोगी श्रीमाताजींच्या स्वागतासाठी जमले होते. श्रीमाताजींच्या आगमनामुळे झालेल्या दर्शनामुळे सर्वजण अतिशय आनंदी झाले होते. त्यावेळी सर्वांनी आनंदाने, श्री जगदंबे आई रे मेरी निर्मल माँ हे भजन सामूहिकतेत म्हणण्यास सुरवात केली. त्यावेळी सर्वत्र अतिशय चैतन्यमय वातावरण झाले होते. त्यावेळी श्रीमाताजींच्या प्रसन्न, आनंदी दर्शनाने सर्वजण आनंदी होऊन आपल्या घराकडे निघाले. ● ● ●

## धनत्रयोदशीची पूजा - बुधवार दिनांक ७ नोहेंबर २००७

आज धनत्रयोदशीच्या निमित्ताने श्रीमाताजींच्या नॉयडा मधील घरी पूजेचे आयोजन केले होते. त्यावेळी श्रीमाताजींच्या घरी साधारण १५-२० सहजयोग्यांनी श्रीमाताजींच्या चरणकमलाची गृहलक्ष्मीच्या स्वरूपात सर्व जगातील सहजयोग्यांच्यावतीने पूजा केली. पूजेच्या वेळी श्रीमाताजी अत्यंत प्रसन्न होत्या. त्यांचा चेहरा अतिशय तेजस्वी दिसत होता. त्यांच्या अस्तित्वाच्या काळात सर्वत्र एक वेगळाच सुगंध जाणवत होता. त्यावेळी श्रीमाताजींनी अत्यंत प्रेमाने पूजेचा स्वीकार केल्याचे त्यांच्या प्रसन्न व आशीर्वादीत चेहऱ्यावरून प्रतिबिंबीत होत होते. त्यावेळी सर्व उपस्थितांनी श्रीमाताजींच्या समोर सर्वांना आशिर्वादीत करण्यासाठी प्रार्थना केल्या.

भारतीय परंपरेनुसार हा दिवस म्हणजे गृहलक्ष्मीच्या दिवसाचे प्रतीक आहे. आजच्या दिवशी गृहलक्ष्मीबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी स्वयंपाकगृहामधील कोणतीही एखादी वस्तू किंवा इतर कोणतीही भेटवस्तू खरेदी करतात व घरातील गृहलक्ष्मीला ती भेट देतात. अशा या पवित्र दिवाळीच्या दिवशी सर्व जगातील सहजयोग्यांच्या वतीने पूजा करण्यात आली. ● ● ●

## श्रीमाताजींबरोबर संगीतमय रात्र

### दिवाळी पूजा, १० नोव्हेंबर २००७



आजच्या दिवसाची सुरवात युवाशक्तीचे सेमिनारने झाली. त्यावेळी युवाशक्तीसाठी बरीच महत्त्वाची माहिती देण्यात आली. त्यावेळी वेगवेगळ्या युक्त्या वापरून सहजयोग पसरविण्याचे कार्य कसे करावयाचे तसेच इंटरनेटमधून कसा सहजयोग पसरवायचा हे सांगण्यासाठी एक वेगळे सत्र घेतले. सीता (सहज इंटरनेट टीम) च्या कार्याबद्दल माहिती देताना त्यांनी श्रीमाताजींची अमृतवाणी इ-मेल वर पाठविताना प्रथम स्वत: ऐकावी त्यानंतर त्यात काही खाजगी माहिती असेल तर ती न पाठविता सहजयोग्यांच्या उपयोगाची माहितीच पाठवावी. त्यावेळी काही चुकीची माहिती इ-मेल वर पाठविल्याबाबत चर्चा झाली. त्यावेळी अनेक सूचना करण्यात आल्या.

त्यानंतर श्रीमाताजींचे आगमन स्टेजवर झाले. श्रीमाताजींनी सुरवातीला सर्वांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर साधारण तासभर श्रीमाताजी बोलल्या. त्यामध्ये महत्त्वाचा मुद्दा होता की, सर्व सहजयोग्यांना आपल्या जबाबदारी व कर्तव्याची जाणीव करून देणे .श्रीमाताजींनी त्यांच्या भाषणाची सुरवात इगो विषयाने केली. त्या म्हणाल्या की, आपल्या आयुष्यामधील अंधाराचे कारण म्हणजे केवळ आपला इगो आहे.

लोक भ्रष्टाचार व अप्रमाणिकपणा यां सारख्या गोष्टीत अडकून जातात. कोणीही खोटे बोलणाऱ्याला साथ देऊ नये. श्रीमाताजी सारख्या या एकाच गोष्टीवर भर देत होत्या. म्हणजे कर्तव्यनिष्ठा, प्रामाणिकपणा. त्यांची इच्छा होती की, आपण सर्वांनी या दिवशी एक संकल्प करावा की आपण जे कोणी खोटे बोलतात, अप्रामाणिक आहेत, भ्रष्टाचारी आहेत त्यांच्या विरोधात जावे. जमलंच तर एक अशी कमिटी करावी तिचे कुठल्याही योग्यांनी कोणीही अप्रामाणिकपणा करत असेल किंवा भष्टाचार करीत असेल तर त्यांनी या कमिटीला सांगावे व त्यांनी सरकारची मदत घेऊन पाहिजे ती कृती करावी.

एका क्षणानंतर श्रीमाताजी म्हणाल्या की, जर सहजयोग्यांचीच एक कमिटी बनली एखादे १०/१२ जणांची कमिटी केली तर हे लोक भ्रष्टाचारी, खोटे बोलणाऱ्या लोकांना चांगलाच धडा शिकवतील.त्यानंतर त्या म्हणाल्या की, तुम्ही सर्वजण आत्मसाक्षात्कारी आहात, तुमच्या हृदयात एक ज्योत तेवत असून त्यामुळे तुम्ही खोटारड्या, अप्रामाणिकांना व भ्रष्टाचाऱ्याना ओळखून त्यांना धडा शिकवू शकाल. आताच्या भारताच्या दृष्टीकोनाने त्या म्हणाल्या की तुम्हा सर्वांना आपण भारतीय आहोत याचा अभिमान पाहिजे.

तुम्ही आधीच देवदेवतांच्या प्रेमाने व शक्तीने आशीर्वादीत आहात.तुम्ही एका आशीर्वादीत देशात राहता पण आता काय झालेय तुम्हाला? आता कितीतरी लोक आहेत, ज्यांना खोटे बोलण्याची सवय झाली आहे. तुम्ही अशा लोकांना आधार देऊ नये. आपल्या मधून फक्त प्रामाणिकपणा व खरेपणा आला पाहिजे.

त्यानंतर श्रीमाताजी जगातील पालक व मुलांच्या विषयी बोलल्या. अमेरिकेसारख्या विचित्र देशात आपल्या मुलाला १६ वर्षाचा झाल्यानंतर पायावर उभा रहाण्यासाठी घराबाहेर काढतात. पण भारताच्या संस्कृतीमध्ये आपण असे काही विचार देखील करणार नाही. उलट मुलाचे वडील अजून कष्ट करून आपल्या मुलाच्या भविष्याची तयारी करतात. मुलाच्या १६ वर्षानंतर. तुम्ही तुमच्या मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

प्रत्येकाला आपल्या देशाविषयी अभिमान असलाच पाहिजे. हे मुख्यत: भारतीयात आहे, त्यांनी मोठ्या अभिमानाने भारतात नैतिकता जपली पाहिजे. मगच त्याला आपण खरा भारतीय म्हणू शकतो. त्या म्हणाल्या की, भारत हा महान देश

आहे, यात सर्वात जास्त आत्मसाक्षात्कारी लोक आहेत. हा एक आशीर्वादीत देश आहे.

रशियाबद्दल बोलताना म्हणाल्या की, रशिया पण एक महान देश आहे आणि त्याच्या या समाजवादी देशकार्यामुळे तेथले लोक खरे बोलायला शिकले. हे लोक फार खोटे बोलत नाहीत. जर भारत समाजवादी देश असता तर लोक एवढे खोटे बोलले नसते. भ्रष्टाचाराचे व अप्रामाणिकपणाचे एक उदाहरण देत श्रीमाताजी म्हणाल्या की, जेव्हा त्या पूजेच्या ठिकाणी येत होत्या तेव्हा एक खूप मोठा खड्डा आला, खूपच वाईट रोड बनवला होता. त्या म्हणाल्या की त्या रोडच्या बांधकामामुळे अप्रामाणिकपणा दिसून येतो. हे लोक दुसऱ्यांना फसवतात. अप्रामाणिकपणाने हा देश चालवत आहोत म्हणून खरच एखाद्याने या सर्व अप्रामाणिकांच्या विरुद्ध जाऊन आपल्या सरकारला मदत करावी.

जे दारू पितात, तंबाखू खातात ते सर्वजण नरकात जातील, स्वर्गात त्यांना काही जागा नाही. स्वर्ग पूर्णपणे प्रज्वलित आहे व आपण या वाईट कृत्याचा विरोध केला पाहिजे. आजूबाजूच्या गोष्टी बघून श्रीमाताजी म्हणाल्या की, यमुना नदीमध्ये जो काही कचरा टाकतात ही एक भयानक गोष्ट आहे व आपण सरकारला व कॉर्पोरेशनला हे थांबवण्यासाठी मदत केली पाहिजे. दिवाळीच्या सर्व तेजोमय वातावरणामध्ये श्रीमाताजी म्हणाल्या की, या दिवशी सीताजींनी जन्म घेतला होता म्हणून आपण सर्व नितीमत्तेच्या गोष्टींचा आदर केला पाहिजे.

त्यांच्या भाषणामध्ये त्यांनी स्वराज्य या शब्दाचा अर्थ सांगितला की जो नेहमी देशप्रेम व्यक्त करण्यासाठी वापरला जातो. त्या म्हणाल्या की, स्वराज- स्व म्हणजे स्वत: व राज म्हणजे राजेशाही आणि दुसरा शब्द स्वतंत्र- स्व म्हणजे स्वत: आणि तंत्र म्हणजे मशिनरी. म्हणून या दोन्ही शब्दाचा अर्थ स्वत:ला बरोबर रीतीने चालवणे आहे. जेव्हा कधी आपण स्वतंत्र म्हणतो, तेव्हा याचा अर्थ स्वत:चा तंत्र म्हणून समजला पाहिजे.

एखाद्या देशाची व्यक्ती बनण्यापूर्वी स्वत: कोण आहे हे ओळखले पाहिजे. त्या स्वराज्याविषयी सांगताना म्हणाल्या की, आपल्याला आतून आले पाहिजे की, आपण एक भारताचे नागरिक आहोत व त्याचा तुम्हाला अभिमान असला पाहिजे. प्रत्येकाने आपल्या कृतीमधून दाखविले पाहिजे की आपण भारतीय आहोत.

(श्रीमाताजींच्या भाषणाचा आशय दिलेला असून त्यांचे प्रत्यक्ष भाषणाचा अनुवाद पुढील अंकात देण्यात येत आहे )

● ● ●

## श्रीमाताजी व सर सी.पी. काही चीनी वस्तू खरेदीसाठी जाताना
### बुधवार, दि. १७ ऑक्टोबर २००७

श्रीमाताजींनी आज त्यांच्या दुसऱ्या खरेदी सहलीच्या निमित्ताने सर्वांना आशीर्वादीत केले. त्यांनी चीनीमातीपासून बनविलेल्या बऱ्याच काचेच्या वस्तूंची खरेदी केल्या की ज्यामध्ये डिनर सेटचाही समावेश होता. त्यावेळी त्या दुकानाच्या नशीबवान व्यवस्थापक महिलेले श्रीमाताजींकडून आत्मसाक्षात्कार घेतला.

श्रीमाताजींनी त्यावेळी तिला विचारले की, 'तू बऱ्याच वर्षापासून या मार्गाच्या प्रतिक्षेत होतीस का?' त्या महिलेने उत्तर दिले की, 'होय श्रीमाताजी मी बऱ्याच कालावधिपासून या मार्गाच्या शोधात होते'

ती महिला त्यावेळी श्रीमाताजींना जवळजवळ एक तास वेगवेगळ्या वस्तू दाखवित होती. त्यावेळी ती हात जोडून म्हणाली की, श्रीमाताजी माझे अत्यंत भाग्य आहे की आपण माझ्या दुकानात आलात आपले चरण माझ्या दुकानाला लागले आणि आपल्या हातून मला आत्मसाक्षात्कार मिळाला.

त्या संपूर्ण खरेदी सहलीनिमित्त सर्वांना श्रीमाताजींच्या सहवासात दोन तास आनंद घेण्याचे भाग्य मिळाले.

● ● ●

## नवरात्रीच्या कालावधीत रोज श्रीमाताजींच्या साकार/निराकार स्वरूपात झालेल्या पूजेचा (वृत्तांत)


### नवरात्रीची पहिली रात्र
शुक्रवार, १२ ऑक्टोबर २००७



आज दिनांक १२ ऑक्टोबर रोजी जगभरामधून आलेल्या सर्व सहजयोग्यांनी सीडनी येथील लखूड आश्रम येथे आमच्या प्रिय आईची नवरात्रीच्या पहिल्या दिवशीच्या पूजा समारंभ व आराधनेसाठी एकत्र जमून श्रीमाताजींची साकार स्वरूपात पूजा केली

००

### नवरात्रीची दुसरी रात्र
शनिवार, १३ ऑक्टोबर २००७




खरेदीचा दिवस आणि श्रीमाताजींची अमृतवाणी

आजचा दिवस हा अशा प्रकारचा दिवस होता की ज्याचा आनंद खरोखर शब्दामध्ये व्यक्त करणे कठीण आहे. कारण या दिवशी श्रीमाताजींनी स्वत: पूजेसाठी उपस्थित राहून संपूर्ण जगाला प्रेमाने आशीर्वादीत केले. या दिवशी श्रीमाताजीं अमृतवाणी देताना खळखळून हसताना, स्मितहास्य करताना पाहून खरोखरीच सर्वांना खूप आनंद वाटत होता.

आज सकाळीच श्रीमाताजींनी खरेदीसाठी जाण्याची इच्छा व्यक्त केली आणि 'रोझवूड फर्निचर' या आशियातील सुप्रसिद्ध फर्निचरच्या दुकानामध्ये खरेदीसाठी जमलेले सर्व सहजयोगी स्वत:च्या गाड्यातून श्रीमाताजींच्या दर्शनासाठी व सहवासासाठी श्रीमाताजींच्या सोबत दुकानात पोहचले . त्यावेळी सर्व सहजयोग्यांकडे पाहून दुकानदाराला एकाचवेळी एवढे खरेदीसाठी जमलेल्या लोकांकडे पाहून आनंद झाला. त्यावेळी श्रीमाताजी व सर सी.पी. साहेबांनी दुकानातील सर्व वस्तूजवळ जाऊन त्या वस्तूंबद्दल चर्चा करून सहजयोग्यांबरोबर चर्चा करून अनेक वस्तू खरेदी केल्या. त्या सर्व श्रीमाताजींनी खरेदी केलेल्या वस्तू बाजूस ठेवल्या.

दुकानामधून निघताना श्रीमाताजींना दुकानदाराने खरेदी करताना चहापानाचे न विचारल्याचे पाहून भारतात खरेदीच्या वेळी दुकानदार करीत असलेल्या चहापानाच्या आग्रहाची आठवण झाली. त्यानंतर श्रीमाताजी परत बरवूड येथे परतल्या आणि नवरात्रीच्या दुसऱ्या रात्रीच्या पूजेची तयारी सुरू झाली. पूजेसाठी इंग्लंड, साऊथ आफ्रिका, युक्रेन, ग्रीस, इत्यादी विविध देशांमधून प्रतिनिधी म्हणून आलेल्या सर्व सहजयोग्यांना भेटण्यासाठी सर सी.पी. व श्रीमाताजी मुख्य पूजेच्या हॉलमध्ये आले. त्यावेळी सर्वजण 'स्वागत गीत ' म्हणू लागले.त्यावेळी श्रीमाताजींनी माईक बद्दल विचारले. त्यानंतर त्यांनी सर्वांचे अत्यंत आनंदाने स्वागत केले. त्यावेळी श्रीमाताजी म्हणाल्या की, 'तुम्हा सर्वांना इथे पाहून मी खूप खूप आनंदी आहे. पुढे त्या म्हणाल्या की, नवरात्रीची ही दुसरी रात्र



आपणा सर्वांसाठी खूप महत्त्वाची आहे.'

त्यानंतर श्रीमाताजींनी सर्वांना आपले दुसरे चक्र कोणते आहे हे विचारल्यावर सर्वांनी 'स्वाधिष्ठान चक्र' असे सांगितले. त्या म्हणाल्या 'हो, हे चक्र फार महत्त्वाचे चक्र आहे हे चक्र आपल्या विचारांवर नियंत्रण ठेवते. पाश्चात्य संस्कृतीचे लोक फार विचार करतात. ते विचारच माणसाच्या मनामधील आतील शांती कमी करतात. ती शांती मुक्त विचारांची अशी स्थिती आहे की जी स्थिती आपणास मिळवायची आहे. अशाच शांत स्थितीमध्ये आपणास रहावयाचे आहे. पण ही शांती पाश्चिमात्य देशांमध्ये मिळणे खूप कठीण आहे.'

श्रीमाताजी पुढे म्हणाल्या की, 'आपल्यामधील बऱ्याच आरोग्याच्या समस्या, स्वाधिष्ठान चक्राच्या खराबीमुळे निर्माण होतात आणि तुम्ही स्वाधिष्ठान चक्राच्या अधीन होऊ नका. तर स्वतः स्वाधिष्ठान चक्रावर ताबा मिळवा आणि त्याला तुमच्या अधीन होऊ द्या. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्ही विचार करू नका. शांत रहा, खूष रहा'. त्यानंतर श्रीमाताजींची चरण पूजा झाली. त्यानंतर श्रीमाताजींना जमलेल्या सहजयोग्यांनी भेट वस्तू दिल्या. तसेच जगाच्या चारही कोपऱ्यामधून आलेल्या सहजयोग्यांनी श्रीमाताजींना फुले अर्पण केली. तो क्षण खरोखरच त्या ठिकाणी उपस्थित असणाऱ्या सहजयोग्यांसाठी अतिशय आनंदाचा, भारावून टाकणारा क्षण होता. साक्षात आदिशक्ती जगाला उद्देशून बोलत होती आणि ते सर्व उपस्थित सहजयोगी या अनमोल क्षणांचे स्वतः साक्षीदार होते.

## नवरात्रीची तिसरी रात्र

रविवार, १४ ऑक्टोबर २००७

○○

## नवरात्रीची चौथी रात्र

सोमवार, १५ ऑक्टोबर २००७

या दिवशी श्रीमाताजींची निराकार स्वरूपात पूजा व भजने झाली.

○○

## नवरात्रीची पाचवी रात्र

मंगळवार १६ ऑक्टोबर २००७

आजच्या रात्री श्रीमाताजींच्या चरणाची बराच वेळ पूजा झाली. रात्री साधारण ७.४० पर्यंत पूजा चालली होती. पूजेनंतर श्रीमाताजींनी सर्वांना संदेश दिला की, आपण सर्वांनी प्रार्थना केली पाहिजे की, 'आपल्यामधील नकारात्मक शक्तीचा नाश करा.'

○○

## नवरात्रीची सहावी रात्र

बुधवार, १७ ऑक्टोबर २००७

आज नवरात्रीची सहावी रात्र आहे . ही प्रत्येक रात्र आपणास आणखी सखोल आध्यात्मिक प्रगती प्राप्त करून देते आणि अशा पवित्र ठिकाणी नेऊ पहाते की जे पवित्र ठिकाण फक्त आपल्या आईला माहीत आहे आणि स्वतः तिचेच तिथे वास्तव्य आहे.

या दिवशी श्रीमाताजी आमच्या सोबत जवळजवळ ३ तास होत्या आणि जास्त वेळ त्या आमच्याशी बोलत होत्या. श्रीमाताजीं सर्व प्रथम हॉलच्या अपुऱ्या जागेबद्दल बोलल्या. आता आपणास मोठी जागा असणारा हॉल असायला हवा असे त्या म्हणाल्या. तेव्हा आपल्या बालमोरला सहजयोगाच्या मालकिच्या असणाऱ्या जागेमध्ये एक प्रशस्त हॉल आहे. परंतु आपल्या सोई,सुविधांच्या दृष्टीने तो लांब असल्यामुळे व







आपल्याला इतका लांबचा प्रवास होऊ नये म्हणून इथेच कार्यक्रमाचे आयोजन केले आहे असे सांगितले.त्यानंतर श्रीमाताजी म्हणाल्या की,'सहजयोगाच्या कार्यक्रमासाठी माझ्यासाठी प्रवास ही गोष्ट फार मोठी नाही.' कारण सहजयोगाचे कार्यक्रम कुठेही असले तरी मी तिथे उपस्थित असते.'

त्यावेळी श्रीमाताजींनी महाराष्ट्रामधील सहजयोगाच्या प्रचार प्रसाराच्यासाठी फिरलेल्या त्या दिवसांची आठवण सर्वांना करून दिली. त्यावेळी मी मैलोनमैल बैलगाडीतूनही प्रचार व प्रसारासाठी प्रवास केला आहे आणि तेव्हाही आणि कधीही मला काहीही त्रास वाटला नाही असे म्हणाल्या. पुढे श्रीमाताजी म्हणाल्या की, आपणही नेहमी सहजयोगाच्या कार्यक्रमाबद्दल बांधिलकी ठेवायला हवी. तितके समर्पित असायला हवे. हे सर्व सहजयोग्यांसाठी अत्यंत महत्त्वाचे आहे. आपण नियमित, शांततेमध्ये पूर्ण समर्पणाने सहजयोगाच्या कार्यक्रमांना उपस्थित रहायला हवे. त्यावेळी श्रीमाताजी बऱ्याच वेळ दारुमुळे त्या कुटुंबावर होणाऱ्या परिणामांबाबत बोलल्या. त्यावेळी अशा कुटुंबामध्ये होणाऱ्या मद्यसेवनाविरुद्ध ठामपणे भूमिका घ्यायला हवी. रात्री श्रीमाताजींच्या चरणाची पूजा करण्यात आली. त्यानंतर श्रीमाताजींना असंख्य भेट वस्तू देण्यात आल्या. त्यावेळी सर्वत्र प्रचंड आनंद जाणवत होता.

त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींच्या चरणावर त्यांचे उत्तम आरोग्य राहण्यासाठी प्रार्थना केली की, जी गोष्ट सर्व सहजयोग्यांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. श्रीमाताजींनी ताऱ्यापर्यंत (परमात्म्यापर्यत) पोहचण्यासाठी एक शिडी तयार केली असून प्रत्येक सहजयोगी त्या शिडीची प्रत्येक पायरी पार करीत आपली आध्यात्मिक प्रगती आईच्या कृपेत करतो.श्रीमाताजी आम्ही आपल्या सभोवताली असणारा दैवी प्रकाश, दैवी तेज पहातो तेच सत्याचे तेज आम्हाला, आम्ही कशाप्रकारे नेहमी नैतिक रहायला हवे, सत्यापर्यत पोहचण्याची कशाप्रकारे वाटचाल करायला हवी, सत्याची पारख करण्याची दृष्टी कशाप्रकारे निर्माण करायला हवी, सत्यासाठी आपल्या आधिकारासाठी आम्ही कशा प्रकारे ठाम राहयला हवे, कशाप्रकारे सत्याची कास धरायला हवी या गोष्टीची जाणीव करून देता.

त्यानंतर आम्ही प्रार्थना केली की, आपणच आपले ईश्वरी कार्य आमच्याकडून करून घ्या. आमचे हात हे नेहमीच या ईश्वरी कार्यासाठी तत्पर असू द्या आणि आमच्या पायाखाली असणारी वाटही नेहमी याच सत्याच्या मार्गाने जाऊ देत. आमची हृदये याच ईश्वरी प्रेमाने सतत वाहून नेणारी असावीत. आमच्या मुखामध्ये सतत आपली भजने असू देत. आणि या सत्याच्या मार्गाने चालताना या सत्याला सामोरे जात असताना कोणत्याही प्रकारच्या वादळांना जरी तोंड द्यावे लागले तरी त्यावेळी आपले आशीर्वाद सदैव आमच्या पाठिशी राहू देत.त्यानंतर श्रीमाताजी आपल्या शयनकक्षात परतल्या.

● ● ●

## नवरात्रीची ७ वी रात्र
गुरुवार, १८ ऑक्टोबर २००७



आज आम्हाला आईची तिच्या निराकार स्वरूपामध्ये पूजा करण्याची संधी मिळाली. त्यावेळी श्रीमाताजींचे बाजूच्या खोलीमध्ये वास्तव्य होते. पूजा सुरू झाल्यानंतर सर्वत्र प्रचंड चैतन्य जाणवत होते. त्यावेळी कोणत्याही प्रकारच्या संगीताच्या व मंत्रांच्या शिवाय पूजा पूर्णपणे शांततेत पार पडली.त्यावेळी पवित्र अशा संस्कृत मंत्रांचे हळू आवाजात पठण केले. बाजूच्या खोलीमध्ये आराम घेत असलेल्या श्रीमाताजींना कोणत्याही प्रकारच्या आवाजाचा त्रास होऊ न देता शांत वातावरणात पूजा पार पडली.

त्यावेळी ध्यानाच्या खोलीमध्ये जवळ जवळ १५० सहजयोगी जमले होते तसेच बाहेरच्या बाजूला आणखी लोक बसले होते. त्याचप्रमाणे इंटरनेटच्या माध्यमातून जगभरातील लोक पूजेचा आनंद घेत होते. शेवटी सर्वांनी सहस्रारावरील शांततेचा बराच वेळ आनंद घेतला. यामुळे सर्वांना ध्यानातून अधिक गहनतेत उतरण्यासाठी प्रेरणा मिळणार होती.त्यानंतर सर्वांनी श्रीमाताजींच्या निराकार पूजेतील फोटोला नमस्कार करून ध्यानाचा हॉल सोडला. ००

## नवरात्रीची आठवी रात्र
शुक्रवार, १९ ऑक्टोबर २००७

बरवूड आश्रमामध्ये जमा झालेल्या सर्व सहजयोग्यांना पुन्हा एकदा आईच्या पूजेची संधी मिळाली. पूजा संपल्यानंतर आम्ही सर्वांनी श्रीमाताजींच्या चरणी फुले, प्रसाद आणि भेटवस्तू अर्पण केल्या. ००

## नवरात्रीची नववी रात्र
शनिवार, २० ऑक्टोबर २००७

आज नवरात्रीच्या नवव्या दिवशी आम्ही सर्वजण श्रीमाताजींची पूजा करून खूप आशीर्वादीत झालो.पूजा स्थानिक शाळेच्या हॉलमध्ये संपन्न झाली. आज श्रीमाताजी अतिशय आनंदी व प्रसन्न दिसत होत्या. त्यांच्या चरणाची पूजा करण्यात आली. पूजेनंतर त्यांना काही भेट वस्तू देण्यात आल्या. त्यानंतर श्रीमाताजी व सर सी.पी. बरवूडला पुन्हा परतले. पूजेवरून घरी आल्यानंतर दिलेल्या भेटवस्तू परत पहाण्याची श्रीमाताजींनी इच्छा व्यक्त केली. त्यानंतर श्रीमाताजींनी भेटवस्तू पहात त्या भेटवस्तुं संदर्भात माहिती देत असताना सर्व उपस्थितांनी श्रीमाताजींच्या सहवासाचा आनंद घेतला.

आईचे आपणा सर्वांवर इतके प्रेम आहे की ज्या प्रेमामुळे सलग नऊ रात्री तिने तिच्या दैवी स्वरूपामध्ये पूजा करण्याची संधी आम्हाला दिली आणि जसजशी नवरात्रीची एक एक रात्र वाढत गेली तसतशी आईने आपल्या भक्तांसाठी आध्यात्मिक उन्नतीसाठीची मुक्तीची वाट भक्तांना प्रदान केली. सर्वांच्या इच्छेनुसार आईने आम्हाला तिची साकार स्वरुपात पूजा करण्याची संधी दिली, इतके अनंत आशीर्वाद आम्हाला प्रदान केले, त्याबद्दल आम्ही सर्वजण आईचे शतश: ऋणी आहोत.नवरात्रीमधील प्रत्येक रात्र आम्हाला आमच्या आत्मिक, आध्यात्मिक प्रगतीची प्रत्येक पायरी चढवून नेत होती की, ज्या प्रगतीचा अनुभव पूर्वी कधी आम्हाला आलेला नव्हता आणि आता आम्ही नवरात्रीच्या समारोपाच्या रात्रीपर्यंत आलेलो आहोत आणि आम्ही आपल्या आंतरिक शुद्धतेचा पवित्रतेचा, सहजयोगाच्या गहनतेचा खूप खूप आनंद घेत आहोत की जो आनंद अविस्मरणीय आहे. श्रीमाताजी आम्ही सर्व आपले अत्यंत आभारी आहोत. ● ● ●



## नवरात्री पहिली रात्र - शुक्रवार दि. १२ ऑक्टोबर २००७











# नवरात्री दुसरी रात्र - शनिवार दि. १३ ऑक्टोबर २००७








# नवरात्री पाचवी रात्र - मंगळवार दि. १६ ऑक्टोबर २००७











## नवरात्री सहावी रात्र - बुधवार दि. १७ ऑक्टोबर २००७








## नवरात्री नववी रात्र - शनिवार दि. २० ऑक्टोबर २००७





## ख्रिसमस पूजा

प.पू. श्रीमाताजी निर्मलादेवींचे भाषण
२५ डिसेंबर, २००२ गणपतीपुळे



श्री ख्रिस्तांच्या जीवनातून,
जगाच्या आजच्या
समस्यांकडे पहा.
त्या निराकर करण्यासाठी
जगाला आज
तुमची जरूरी आहे

सहजयोगानुसार ख्रिस्तांचे स्थान तुमच्या आज्ञाचक्रावर स्थित आहे. त्यांच्या संपूर्ण जीवनातून आत्मसाक्षात्कारी महात्म्याचे गुण प्रकट झालेत. त्यातून त्यांना हेच सुचवायचे की तुमच्यात कसल्याही प्रकारची वासना वा हाव (greed) नसावी. आज जगात लोक एवढे लोभी पाहून धक्काच बसतो. अगदी लहान पणापासूनच बालवयात याची सुरवात होते. अमके हवे तमके हवे, ही हाव अशीच वाढत जाते की कधीही त्यांचे समाधान होत नाही. फक्त पूर्ण समाधानच तुम्हांला संतुलन प्राप्त करून देईल ज्यामुळे तुम्ही असल्या गोष्टींपासून दूर रहाल.

भारतासारख्या देशात पाश्चात्त्य वृत्ती वाढत आहे व लोकही अधिक लोभी झालेत. प्रत्यक्ष अमेरिकेत लोक हे सर्व मिळवून त्यांना कुठलेच समाधान प्राप्त झाले नाही आणि आता ते अध्यात्माकडे वळू लागले. पण आपण ख्रिस्ताच्या जीवनाकडे पाहिले पाहिजे. ज्या देशात त्यांचा आदर केला जातो तेच देश तेथील लोक नुसते पैशाच्या मागे आहेत, एवढेच नाही तर त्याचा गर्व करतात आणि गळ्यात क्रॉस घालून हिंडतात. ज्या क्रॉसवर ख्रिस्तांनी आपला अंत स्वीकारला, ते त्यांनी आपल्या गळ्यात का घालावे? हा सर्व दांभिकपणा आहे आणि त्यांच्या वासना व हावरेपणाला काही सीमाच राहिली नाही. आणि भारतातही या गोष्टीचे अनुकरण व्हायला लागले. पण अमेरिके सारख्या देशात जेथे भ्रष्टाचार नव्हता, तेथे लोक संपत्तीच्या मागे लागले, मालमत्ता वाढवू लागले., जे लोक स्वत:ला ख्रिस्तांचे अनुयायी मानतात. भारत जो एकवेळ संताचा देश म्हणत तेथेही लोक हावरेपणाच्या अगदी खालच्या स्तरावर पतित झालेत. या लोकांना हे वागणे समजणे अशक्य आहे, जे ख्रिस्तांच्या तत्त्वा विरुद्ध आहे.पण जे ख्रिस्ताला मानतात ते पण या हावरटपणाच्या आहारी गेलेले दिसतात.

ख्रिस्त हे महान प्रेषित होते. त्यांची त्यागवृत्ती मोठी होती. ते स्वत: गरीब परिस्थितीत जगले. त्यांचे जीवन फार अल्प होते, कष्टमय होते. . जे पैशाच्या मागे धावतात ते ख्रिश्चन नाहीत. या देशात ख्रिश्चनांच्या कारवायांबद्दल बरेच काही ऐकू येते. ते इतर लोकांचे धर्मांतर करून ख्रिश्चन बनवतात. याउलट ख्रिस्तांनी लोकांत परिवर्तन घडवले, लोकांचे धर्मांतर केले नाही. मला सहजयोग्यांची काळजी वाटते, ते असे असहज वागणार नाहीत, ख्रिस्तांच्या विरोधात . सहजयोगातील तत्त्वानुसार तुम्ही लोकांना मदत केली पाहिजे, की जे निराधार आहेत.तुम्ही त्यांना आत्मसाक्षात्कार दिला पाहिजे. तुम्हांला आत्मसाक्षात्कारातून लाभलेल्या शक्तीमुळे तुम्ही उन्नत होऊन लोकांना मदतीची भावना वाढवून तुम्ही आपल्या देशाला, सर्व विश्वाला वाचवू शकाल. ही मदतीची भावना, आतून तो तुमचा स्वभाव बनला पाहिजे.

महाराष्ट्रात अनेक पुढारी, त्यागी व उदार होते. त्यांनी स्वातंत्र्यलढ्यात स्वत:ला झोकून सर्व काही त्याग केला. पण आजचे चित्र पाहिले तर त्यांचीच मुले सत्ता व पैसा जमवण्याच्या मागे लागलेली दिसतात. तसेच जी राष्ट्रे - ख्रिश्चन आहेत ती या ख्रिस्तांचे अनुकरण करत नाहीत. ज्याची 'त्यागवृत्ती' हाच प्रथम आदर्श होता.याचा अर्थ असा नाही की आपल्या उदरनिर्वाहासाठी पैसा कमवायचा नाही पण जे काही आपण मिळवतो त्यातूनच काही त्याग आपण केला पाहिजे. सहजयोगी हे पूर्ण प्रेमळ व दयाळू असले पाहिजेत,तसे नसतील तर ते सहजयोगी नव्हेत.लोकांचे प्रश्न समजून जास्तीत जास्त लोकांना मदतीचा हात दिला पाहिजे. त्याच ख्रिस्तांच्या मार्गावर आपण आहोत, हे अजून काही सहजयोगी जाणत नाहीत. त्यांच्या त्यागवृत्तीची आपण जाणीव ठेवली पाहिजे. हे आपली आज्ञा वरील (पकड) दूर करण्यासाठी व अहंकार कमी करण्यासाठी आवश्यक आहे. त्याविरुद्ध आपण झटले पाहिजे. त्यांच्या जीवनाचा हाच महान संदेश आपण सर्व आत्मसाक्षात्कारी लोकांसाठी आहे.

माझे चित्त नेहमी गरजू व निराधार लोकांकडे ओढले जाते. विशेषत: सोडलेल्या व निराधार अशा स्त्रियांच्या साठी, दिल्लीत त्यांच्या विस्थापनेसाठी एक संस्था, तयार केली आहे. त्यासाठी लागणारा बराचसा फंड मी उभा केला आहे. निराधार अशा स्त्रियात मुस्लीमांची संख्या जास्त आहे. अशांना ह्दयातून, नि:स्वार्थपणे मदतीसाठी सर्व मानवजातीसमोर हे उघड करायला हवे. सहजयोग्यांनीही स्वत:पुरते न पहाता ते त्यांचे कर्तव्य आहे की गरजूंना मदत करण्यास पुढे सरसावले पाहिजे. मग सहजयोग्यांनी आम्हाला मदतीचा हात दिला, असे ते म्हणू शकतील. सहजयोग्यांनी अशा निराधार लोकांसाठी झटले पाहिजे.गरीब लोकांच्या समस्यांकडे पाहून माझे ह्दय पिळून निघते. तुम्हीच त्यातून काही मार्ग काढून त्यांना मदत कराल. ते तुमच्या महालक्ष्मी तत्त्वाच्या शक्तीतून तुम्ही करू शकता. तुम्ही बाहेर पडा व जरी ते सहजयोगी नाहीत तरी त्यांना मदतीचा हात द्या जे हालाखीत राहतात.

श्री ख्रिस्तांचे जीवन अत्यंत हलाखीचे व कष्टप्रद होते, तसे तुमचे जीवन असावे असे नाही पण गरीब व गरजू व निराधार लोकांच्या मदतीसाठी तुमच्यात करुणा असावी. त्यांच्यासाठी काय करू शकतो हा विचार करा. आपण सर्व सहजयोगी आहोत व संतांनी जसे (समस्यांना) तोंड दिले तसे आपण दिले पाहिजे, त्या सोडवल्या पाहिजेत. आज आपण श्री ख्रिस्तांचा जन्मदिन साजरा करतो, हा मोठा आनंदाचा दिवस आहे. त्यांचे जीवन फार खडतर व कष्टप्रद असले तरी त्यांच्यामधील त्यागवृत्तीचा त्यांच्या प्रेमशक्तीचा गौरव केला पाहिजे. असे बरेचसे सहजयोगी आहेत. पण अजूनही बऱ्याचजणांची हाव सुटत नाही. उदा. अमेरिकेतील एका कॅारपोरेटरने स्वत:च्या मालकीची २१ विमाने व ५० मोटारगाडया जमविल्या. त्याला वाटत होते मी फार वैभवात आहे, मजेत आहे पण ते सर्व त्याला गमवावे लागले जेव्हा ते सर्व जप्त करण्यात आले. हे सर्व संग्रही वृत्तीमुळे घडते. अशा अत्यंत हावरेपणा असणाऱ्या लोकांच्या बाबतीत हे घडते व एके दिवशी त्या सर्व मालमत्तेला त्यांना मुकावे लागते. तसेच एका वयस्कर धनिकाने एका तरुण मुलीशी लग्न केले व काही दिवसांनी मागे लाखोंची मालमत्ता सोडून तो मृत झाला. मृत्यूनंतर त्याचा मुलगा संपत्तीवर हक्क मागू लागला. शेवटी त्या गृहस्थाची पत्नी व मुलाला या संपत्तीसाठी कोर्टात धाव घ्यावी लागली. शेवटी लोकांना कधी संतुष्टता नसते. त्यामुळे पैसा व वैभवाच्या मागे पळतात हे ग्रहणीय आहे व त्या मधील त्याग भावना लोप पावते.

गांधीजींकडे पहा, त्यांनी गरीब व गरजू लोकांसाठी किती कष्ट घेतले, मोठा त्याग केला. लोकांनाही त्याग करण्यास भाग पाडले. आपण तसे उदार आहोत का? अशी दुसऱ्यांना मदत केली का हे स्वत:ला विचारा. ख्रिस्तांच्या जीवनाकडे पहा जरी ते गरीबीत वाढले तरी ते राजांचे राजे होते. अशा एका व्यक्तीचा आपण मार्ग स्वीकारला पाहिजे. तसे

बनण्याचा आपल्यातील किती लोक प्रयत्न करतात?. त्या कार्पोरेटरसारखे नको कारण आपण सर्व सहजयोगी आहोत. तुम्ही किरकोळ लोक नाहीत. अशा लोकांना प्रेम व अनुकंपा दर्शविणाऱ्या गोष्टी तुमच्याकडून माझ्या कानावर पडू द्या. ख्रिस्त हे अशा तऱ्हेचे 'वैभवशाली' व्यक्तीमत्त्वाचे सहजयोगी होते. त्यांच्या जीवनात त्यांनी अनेक समस्यांना तोंड दिले. त्यांच्या स्वभावाचा खुद्द त्यांच्याच लोकांनी फायदा घ्यायचा प्रयत्न केला. त्यांना त्रास दिला.

एक सहजयोगी जे सहजयोगाबाहेर आहेत त्यांनी मला त्रास द्यायचा प्रयत्न केला. त्यांनी अनेक दिवस माझ्याकडून पैसे लुबाडले. अशांना आत्मासाक्षात्कारी कसे म्हणायचे ? तर तुम्ही विचार करा कशी मदत करू शकता. हे तुम्ही ख्रिस्तांच्या जीवनातून शिकू शकता. मी सुद्धा एका ख्रिश्चन कुटुंबात जन्मले पण ख्रिश्चन लोकांत सुद्धा फार हावरेपणा व क्षुद्रवृत्ती दिसून येते. लोकही या हावरट व मूर्ख वृत्तीची वाहवा करताना दिसतात.सत्तेच्या मागे धावतात. पदांच्या मागे धावतात ते सहजयोगी नाहीत. पण सहजयोगातसुद्धा काही लोक कंजुषी करतात व पैशाच्या मागे लागतात. मला पैसा म्हणजे काय ते कळतच नाही. मलाही फसवायचा प्रयत्न करतात. असल्या वृत्तींचा मी कधीच स्वीकार करणार नाही. त्यांचा विनाश होईल हे त्यांना कळत नाही ही फार खेदाची व मूर्खपणाची बाब आहे.आपण संपत्तीच्या हावरेपणावर मात केली पाहिजे तर तुम्हांला कसल्याच समस्या उरणार नाहीत.

आपण ख्रिस्तांच्या जीवनातून धडा घेतला पाहिजे व जीवनात संतुष्टता ठेवली पाहिजे, समाधान हवे नाहीतर तुम्ही सहजयोगी कसले? आत्मसाक्षात्काराचा काय उपयोग. श्री ख्रिस्तांच्या जीवनातून जगाच्या आजच्या समस्यांकडे पहा. त्यांच्या निराकरणाची जगाला आज तुमच्याकडून जरूरी आहे, अशा हृदयातून मी तुम्हाला आशीर्वाद देते.ईश्वराचे तुम्हाला अनंत आशीर्वाद

• • •

## दागदागिन्याची खरेदी
### रविवार दि. २१. ऑक्टोबर २००७

श्रीमाताजींनी आज दुपारीच खरेदीच्या सहली निमित्ताने पूर्ण सीडनी शहरास आशीर्वादीत केले. श्रीमाताजी सिडनी शहरामधील तीन दागिन्यांच्या दुकानामध्ये गेल्या. त्यांनी मोत्याचे हार, कानातले दागिने व सोन्याच्या बांगड्या पाहिल्या. फार उत्साहीत क्षण होता की ज्याचा आनंद दुकानदारानेही घेतला. शेवटच्या दुकानामध्ये दुकानातील एक नशीबवान सहकारी महिलेने श्रीमाताजींकडून प्रत्यक्ष आत्मसाक्षात्कार घेतला. ती खूपच खुल्या विचाराची मैत्रीपूर्ण महिला होती आणि श्रीमाताजींना तिने खूप आदरसन्मान दिला. ती महिला श्रीमाताजींना 'माता' म्हणून संबोधित होती.

• • •

# सहस्रार चक्र

## सहस्रार चक्रांविषयी प.पू.श्रीमाताजी निर्मलादेवींनी वेळोवेळी केलेला उपदेश (सारांश)

दि. ५ मे १९७० हा शुभ दिवस आपल्या सर्व सहजयोग्यांना, जिज्ञासूवृतीच्या साधकांना अधिकाधिक महत्त्वपूर्ण आहे. कारण या दिवशी अंतिम महान ईश्वरी कार्य म्हणजेच परम आदिशक्तीचे अंतिम चक्र (सहस्रार) उघडण्याची घटना घटित झाली. साऱ्या विश्वातल्या सर्व आध्यात्मिक घटनांमध्ये ही घटना सर्वांत महान आहे. ते (सत्य) अत्यंत सावधपणाने आणि तारतम्य सांभाळून संपन्न केले आहे. परमेश्वरी साम्राज्यात गोष्टी कशा घटित होतात हे मानवाच्या आकलन शक्तीच्या मर्यादेत बसणारे नाही. हे आपल्या लोकांचे सुभाग्य आणि ईश्वरी प्रेम की ज्यामुळे हा आश्चर्यचकित करणारा चमत्कार घडला. ही घटना घडल्याशिवाय लोकांना सामूहिकरीत्या जागृती देणे असंभव होते.

सहस्रारामध्ये सात प्रमुख चक्रांची पीठे अस्तित्वात आहेत. मानवी शरीरात एक हजार नाड्या आहेत. त्यांना ज्योती म्हणतात. त्या सर्वांना प्रत्येकी सोळा हजार शक्ती आहेत. प्रत्येक नाडी विशिष्ट प्रकृतीच्या मनुष्याबरोबर व्यवहार करत असते. या सर्व नाड्यांच्या परिवर्तिततेमुळे आणि एकसूत्रतेमुळे मानवी जीवांची काळजी घेतली जाते.

सहजयोग त्या लोकांसाठी आहे जे पवित्र आत्मे आहेत. इतर सर्व चुकीच्या गोष्टी; समजुती , टाकल्या पाहिजेत. सहस्रार हे नियंत्रित मार्गदर्शक व उत्क्रांतीची शक्ती आहे. म्हणून ते विकसित होण्यासाठी आणि संवर्धित होण्यासाठी प्रत्येकाने स्वतःची प्रगती तपासली पाहिजे. चुकीच्या गोष्टीचे समर्थन करू नका. समर्थन करता म्हणजे तुम्ही त्याचा विचार करता. आपल्याला त्याचा विचार करायला वेळ नाही. मग तुम्ही त्यांच्याशी जागृतीविषयी बोलू लागता तेव्हां तुमचे सहस्रार निश्चितपणे आकारमानात व सूक्ष्मतेत विकसित होईल. त्याची संवेदनशीलता देखील वाढीस लागेल. त्याला अंतर्यामी खोलपणा येईल.

सहस्रार हे आत्म्याचे सिंहासन आहे. सम्राट भव्य म्हणून सिंहासनही भव्य. आत्म्याला तुम्ही जी वागणूक देता ती सहस्त्रारातून व्यक्त होते आणि अशा प्रकारे तुम्ही जागृती देऊ शकता आणि नंतर तुम्ही सूक्ष्मतर स्वरूपाचे होता. सहस्रार प्रकाशमय झाले की तुम्हाला नवीन प्रकाश सापडेल, सूक्ष्म वातावरणातील सूक्ष्म घटना पाहू शकाल, तुमची उच्चतर प्रगती होऊ लागेल. त्यावेळी तुमच्या अवतीभवतीच्या प्रकाशमय लहरी तुम्ही पाहू शकाल.

सहस्राराचे तत्त्व आहे पूर्णत्त्व. सहस्रारात सर्व चक्रे आहेत म्हणून सर्व देवता एक होतात आणि तुम्ही त्यांचे पूर्णत्व जाणू शकता याचा अर्थ जेव्हा तुमची कुण्डलिनी सहस्रारात येते त्यावेळी तुमचे मानसिक, भावनात्मक आणि आध्यात्मिक सर्व काही अस्तित्व एक होते. तुमचे शारिरीक अस्तित्व त्यात एकजीव होते त्याविषयी कोणतीही समस्या नंतर नसते.

बऱ्याचवेळा सांगितले की कसलीही इच्छा करू नका. आता हे नीट समजून घ्या की तुम्ही यापुढे सामान्य माणूस राहिला नाहीत, तुम्ही सर्व बंधनातून मुक्त झाला आहात. तुम्ही सहस्राराच्याही पलीकडे गेला आहात. सहस्रार आपल्या मस्तकामध्ये आहे आणि ती जागा कमळाच्या बंद फुलासारखी आहे. कुण्डलिनी जेव्हां तेथपर्यंत येते तेव्हां हे कमळ फुलते. त्याचेच बायबलात वर्णन केले की 'मी ज्वालांच्या जीभांसारखा येईन' त्याच्या पाकळ्या म्हणजे दुसरे काही

नसून नाड्या (नर्व्ह) असतात आणि प्रकाशित झाल्यामुळे ज्वाळांसारख्या दिसतात. पण त्या ज्वाळांमध्ये दाह असत नाही. त्या तापहीन असतात आणि खूप थंडावा देणाऱ्या आरामदायक असतात. म्हणजे हे कमळ उघडलेलेच राहिले पाहिजे कारण आपल्यामध्ये मानवी प्रवृत्ती अजून शिल्लक असतात. आपला अहंकार व संस्कार (प्रतिअहंकार) हे दोन फुगे वारंवार या कमळाला बंद करू पाहतात.

सहस्रार एवढे स्वच्छ झाले पाहिजे की साबण जसे प्रत्येक गोष्ट स्वच्छ करतो, तसे ते तुमची प्रत्येक गोष्ट स्वच्छ करेल आणि तुम्ही कशाचीही भीती बाळगणार नाही. दुसऱ्यांचा अहंकार व संस्कार याचीही पर्वा करणार नाही. ही जी पातळी आहे त्या पातळीला आपण पोहोचावयाचे आहे. तुमच्यात सर्व प्रकारच्या दुःखाचे निकारण करण्याची क्षमता येईल आणि तुम्ही इतरांना त्यांच्या दुःखात विरंगुळा आणि शांती मिळवून देणारे व्हाल.

तुमच्यात अशी महान घटना घडली आहे की सर्व सहस्रार अंतर्गत असलेल्या देवतांच्या सात पीठांसह उघडले आहे. सर्व हे संपूर्ण तुमच्या आईच्या रूपात आले आहे. जी अतिशय नम्र आहे व महामाया आहे. ही घटना सर्व मानवजातीच्या दृष्टीने व संपूर्ण विश्वाच्या दृष्टीने अतिशय महान आहे की तुम्ही आत्मसाक्षात्कार घेऊ शकता, व दुसऱ्याला समजावू शकता.

मी सहस्रार उघडले ही सर्वात महान घटना आहे. अर्थात मी सहस्राराची स्वामिनी आहे. व सर्व चक्रांची स्वामिनी आहे. पण मी सर्व चक्रांच्याही पलीकडे आहे. फारच पलीकडे आहे. जर अशी परिस्थिती आहे तर तुम्ही सहस्राराची काळजी घेणे फारच महत्त्वाचे आहे.

सहस्रार स्वच्छ ठेवण्यासाठी हृदय उघडले पाहिजे. निरहंकारी झाले पाहिजे. प्रतिक्रिया नको. भौतिकतेला तुमच्यात प्रवेश देऊ नका, समर्पण असावे.

आज जगात सगळीकडे उलथापालथ चालली आहे. मूर्खपणा, वादविवाद, भांडणे व आक्रमकपणा इ. चा अतिरेक होत आहे. अशा परिस्थितीकडेही तुम्ही साक्षीभावाने बघितले तरी सुधारणा घडून येईल. कारण तुमच्याजवळ ती शक्ती आहे व तुम्ही शक्तीशाली आहात. ही शक्ती कार्यान्वित करणारी यंत्रणाही तुमच्यात असल्याने तुम्ही हे सहज करू शकता. पण तेथेही अहंकार आडवा आला तर काम होणार नाही. अहंकार हा तुमच्या उत्थान प्रक्रियेमधील मोठा अडथळा पार केल्याशिवाय तुम्ही सहस्रारात येऊच शकत नाही. त्यानंतर सहस्रार उघडायला काहीच अडचण नाही. त्याला वेळही लागत नाही. पण अहंकार आला की, अहंकारातच तुमचा प्रवास थांबेल.

अहंकाराच्या बाबतीत प्रत्येकाने सतर्क राहिले पाहिजे. कारण हे शेवटचे चक्र उघडल्यशिवाय पुढची प्रगती नाही. ते पूर्णपणे स्वच्छ होऊन उघडल्यानंतरच तुम्ही परमात्म्याशी जोडले जाणार आहात. मगच तुमचे सर्व प्रश्न दूर होणार आहेत. ते इतके क्षुल्लक व निरर्थक असतात की सहस्रार कार्यान्वित झाल्यावर त्याचा मागमूसही उरत नाही. अहंकारविरहीत असे तुमचे व्यक्तिमत्त्व सर्वांना लाभदायी ठरावे.

# विश्व-निर्मला-धर्म

(फेब्रुवारी १९८५ मध्ये नाशिक येथील एका प्रवचनात प.पू. श्रीमाताजींनी सहजयोग्यांच्या धर्माला '' विश्व निर्मला धर्म '' असे अधिकृत नाव दिल्याची घोषणा केली त्या भाषणाचा संक्षिप्त सारांश)

सहजयोग हा एक असा नवा धर्म आहे की ज्यात सर्व प्रचलित धर्मांना सामावून घेतले आहे. या नवीन धर्मात सर्व प्रेषित व अवतरणांचा समावेश केला आहे. त्याला तुम्ही विश्व-धर्म म्हणूं शकता. पण तरीही त्याचे असे खास वैशिष्टय आहे व ते दाखवण्यासाठीं मी त्याला विश्व - निर्मला-धर्म असें नांव देत आहे. तुम्ही आता स्वत:ला निर्मलाइट्स (Nirmalites) म्हणू शकता. कारण तुम्हाला प्रकाशित (Enlightened) करणारी ''निर्मला'' आहे. तुम्हाला विश्व-निर्मला--धर्म हे नांव आवडेल असे मला वाटते. म्हणून आजपासून सहजयोग्यांचा धर्म '' विश्व- निर्मला-धर्म '' झाला आहे असे मी घोषित करते.

हा विश्व-निर्मला-धर्म अत्यंत शुद्ध व अद्धितीय (Pure and Immaeulate) धर्म आहे. हा नवीन धर्म स्वीकारल्यावर तुम्ही कसल्याही चुकीच्या गोष्टी करणार नाहीं. त्याचबरोबर तुम्ही पूर्वी बाळगलेल्या सर्व परंपरा आणि आत्म्याला विसंगत अशा सर्व कल्पना, समजुती सोडून दिल्या पाहिजेत. आत्म्याला शोभा देईल अशाच गोष्टींचा तुम्ही या नवीन धर्मात स्वीकार केला पाहिजे. हेच आपल्या धर्माचे एकमेव सत्य आहे. माझ्या उपदेशामधून मी तुम्हाला हे सर्व शिकवत आहे व शिकवणार आहे. आपल्या या धर्मात सर्व प्रेषितांचा व अवतरणांचा आपण आदर करणार आहोत. त्यांच्या नांवाने आजपर्यंत जे जे धर्म प्रस्थापित झाले त्या सर्वांचे त्यांच्या शिष्यांनीच खच्चीकरण केले आहे. त्याचे कारण म्हंणजे त्यांची शिकवणूक चांगली असली तरी हे शिष्य 'जागृत' नव्हते. पण आतां तुम्ही हे सत्य सिद्ध करू शकता व इतरांना ती अनुभूती देऊं शकता. त्याचे शारीरिक आरोग्याचे फायदे दाखवूं शकता. त्यांतूनच आधिकाधिक लोक सहजात येतील. एरवी 'धर्म' म्हटला की त्यांत बंधने, कर्मकाण्डे असणार असे लोकांना वाटते. पण आपल्या धर्मामधें आत्म्याला जे सुखदायी असेल व जे आपल्या आत्मोन्नतीसाठी हितकारक आहे त्यालाच फक्त मान्यता दिलेली आहे आणि ते सांभाळून आपण जीवनातून पूर्ण आनंद मिळवू शकतो. मग आपण कोठल्या देशाचे आहोत, आपली जात काय, आपला वंश कोणता ह्या सर्व गोष्टी तुम्ही विसरून जाता आणि पुनर्जन्म झाल्यासारखे एक सुंदर कमळ बनता आणि त्याचाच सुगंध सगळीकडे पसरवता.

● ● ●

## आईचे दैवी, पवित्र चरणकमल

हे आई,

तुझ्या दैवी पवित्र चरणकमलामधून चिरंतन शांतता वाहते . हे आई तुझे हे दैवी, पवित्र असे चरणकमल शाश्वत आहेत. ते खूप खूप मृदू, चमकदार व सुंदर आहेत.त्याचा रंग फिकट गुलाबी आहे आणि म्हणूनच त्यांना आईचे तेजस्वी, पवित्र दैवी 'चरणकमल' असे म्हणतात. त्याच शाश्वत, निरंतर शांत अशा चरणकमलांमधून दैवी चैतन्यलहरींचा प्रवाह अखंड वाहत असतो. हे आई, तुझ्याच चिरंतन, शांत चरणकमलांमधून दैवी कार्य घडून येते.

हे आई, तुझ्याच या चरणकमलामधून संपूर्ण विश्वावर प्रकाशकिरणांचा वर्षाव होतो.त्याच चरणकमलांमुळे परमपित्याचे मधासारखे गोड प्रेम आमच्या हृदयामधील प्रत्येक पेशीपेशीमधून कणाकणामधून वाहते. ● ● ●

# अहंकार

आपल्या प्रवचनांमध्ये. प.पू..श्रीमाताजींनी अहंकाराबद्दल वारंवार उपदेश केला आहे. व सहजयोग्यांनी अहंकारावर नियंत्रण करण्यावर भर दिला आहे. त्यांच्या प्रवचनांमधील त्या संबंधातील कांहीं मौक्तिक वचने :-

<u>प्रवचन :-ऑगस्ट १९७९</u>

- मनुष्याचे स्वत:शी इतके तादात्म्य आहे की त्याला स्वत:चे दोष समजून घ्यायचेच नसतात. स्वत:च्या दोषांचे ओझे जन्मोजन्मी वाहण्यापेक्षा ते समजून घेऊन काढून टाकणें हे केव्हाही उत्तम.
- आपल्यावर अहंकाराचे आवरण असेपर्यंत आत्म्याचे दर्शन होणार नाहीं. या अहंकाराशी लढाई करून कांहीं फायदा होणार नाहीं. सहजयोगात अहंकाराशी लढायचे नसते; त्याला समजून घ्यायचे असते.
- जागरूक चित्तानें अहंकाराकडे बघताच तो थंड होतो कारण आपले बघणें प्रकाशमय असते; त्या प्रकाशांत आपल्या अहंकाराचे खेळ आपण बघतो आणि हसतो.
- अहंकार माणसाला गाढव बनवतो. गाढवालासुध्दा काही अक्कल असते. पण माणसाला अहंकार झाला तर त्याच्यासारखे गाढव सुध्दां वागत नाहीं. मनुष्य आणि त्याचा अहंकार यांची बेरीज म्हणजे गाढवच.
- अहंकारामुळें माणूस आपले स्वातंत्र्य गमावून बसतो आणि दिवस रात्र जाळ्यांत वा आपल्याच कोषात अडकून बसतो; स्वत:ला फार मोठा समजूं लागतो. त्याला त्याचा खरा रस्ता समजत नाहीं आणि कुठे चाललो आहोंत हेही समजत नाहीं.

<u>सरस्वती पूजा :- जानेवारी १९८३</u>

- अहंकार हा केवळ असत्य आहे; म्हणून तुम्हाला वाटूं लागते की तुम्हीच प्रत्येक गोष्ट करत आहांत. वास्तविक तुम्ही कांहींच करत नाहीं. तसे वाटणे हा मूर्खपणाच.
- स्वत:बद्दल बोलणें फार वाईट. स्वत:बद्दल बढाया मारायला लागलात की हा अहंकार तुम्हांला सर्व बाजूने घेरेल आणि त्याच्या भिंती वाढल्यानंतर इतक्या जाड होतील की त्यांचा भेद करणें अशक्य होईल.
- कोणीही कसलीही बढाई मारू नये किंवा स्वत:चे मोठेपण दाखवण्याचा प्रयत्न करू नये.
- बोलताना 'मी' ऐवजी 'आम्ही' या शब्दाची भाषा वापरा. त्यातून बोलणे आत्मलक्षी न होता संपूर्ण सहजयोग्यांचे एक सामूहिक जिवंत व्यक्तिमत्त्व (Organism) दिसून येईल.

<u>बुध्द पूजा : ऑगस्ट १९८९</u>

- बुध्दाचा एक संदेश 'अहंकार वाढू देऊ नका' असा होता. कांहीही करत असतांना 'हे मी करत नाही' असाच भाव व श्रध्दा ठेवा. 'सहजयोगासाठीं मी अमुक अमुक करतो' ही भाषाही करू नका.
- सामूहिकतेमधील तुमची उपस्थिती इतरांना आनंददायी कशी होईल इकडेच लक्ष ठेवा.

● ● ●

## गुरू पूजा

**प. पू. श्रीमाताजींचे भाषण, मुंबई १९७२**

[redacted]



आत्मसाक्षात्कार हा तुमचा पुनर्जन्म आहे हे लक्षात न घेता आत्मसाक्षात्कारानंतरही तुमचे चित्त व मागण्या तुमच्याच कुटुंबाच्या समस्यांमध्ये पैशामध्ये अडकून राहिले तर काय फायदा? तुमचे चित्त सतत चैतन्याबरोबर राहिले पाहिजे.

सहजयोगाचा एक अभिनव असा आविष्कार होत आहे. जे सत्य आहे जे 'आहेच' त्याचा आविष्कार कसा होतो हे समजून घ्या. कोलंबस हिंदुस्थान शोधायला बाहेर पडला. तेव्हाही हिंदुस्थान होताच; नसला तर शोध कशाचा घ्यायचा? तसेच सहजयोग होताच, पण त्याचा अनुभव आता तुम्हाला घ्यायचा आहे, काही जणांना मिळालाही आहे. सहजयोग हा त्या परमतत्त्वाकडे जाण्याचा एक मार्ग आहे; एक व्यवस्था आहे; एक प्रणाली आहे; मानवजातीला उन्नत स्थितीवर येण्यासाठी जीवनाला नवीन दिशा देण्यासाठी ही एक व्यवस्था आहे. ज्यामध्ये मानव या विश्वव्यापी चैतन्याची ओळख करून घेऊ शकेल आणि ते परमचैतन्य आत्मसात करू शकेल. याच परमतत्त्वाकडून सारी सृष्टी चालवली जात आहे व त्याच्यातूनच मानव जन्माला आला आहे. फार प्राचीन कालापासून याचा शोध चालत आला आहे. त्याच्याबद्दल बरेच काही लिहिले गेले आहे; प्रेम, पैसा, सत्ता अशा विविध क्षेत्रांमध्ये मानवाचा हा शोध चलत आला आहे. तरीही मानव अजून स्वत:ला नीट ओळखू शकला नाही. तसे पाहिले तर हा एक आनंदाचा शोध आहे. पण मग कुणी संपत्ती मिळाली की आनंद मिळेल असे समजून पैशाच्या मागे लागले, पण त्याचबरोबर ज्यांनी अमाप संपत्ती मिळवली त्यांनाही दु:खापासून सुटका मिळाली नाही; काही लोकांनी तर या निराशेपोटी आत्महत्या करून घेतली.

असे करता करता कुठेच आनंद मिळाला नाही म्हणून लोक धर्माच्या मागे लागले. धर्माच्या पाठीमागे लागल्यावरही त्यांचे चित्त बाहेरच्या गोष्टींमधेच अडकून राहिले आणि त्यांना खरी 'स्व' (स्वत:ची) ओळख झाली नाही. हे असे का होते? कारण माणूस खऱ्या स्व बद्दल अपरिचीत असतो आणि त्यामुळे त्या 'स्व' चे वैभव, ऐश्वर्य, महानता, प्रेम हे त्याच्या लक्षातच येत नाही. त्या अवर्णनीय आनंदाला तो पारखाच राहतो. मानव स्वत:च आनंदस्वरूप आहे व तोच परमानंद आहे. अर्थात हे सुद्धा बहुतेक वेळा शाब्दिकच राहते. बोलाची कढी, बोलाचाच भात म्हणतात त्याप्रमाणे हे होऊन जाते. हे असे अनादि कालापासून चालत आले आहे. याला कारण मानवाचा विचार सदैव 'मना'मधून होत असतो व त्या मनाच्या तो पलीकडे आपल्याला जायला पाहिजे. आता माझे भाषणही नुसते शब्द समजून राहू नका. त्यातून तुम्हाला परमात्मा समजणार नाही. म्हणून जे आपल्याला शोधायचे आहे व मिळवायचे आहे तेथपर्यंत आपण मनाने पोहचू शकणार नाही. तीच गोष्ट बुद्धीची. म्हणून जे परमतत्त्व आपल्याला जाणायचे आहे त्याच्यासाठी मन-बुद्धीच्या पार झाले पाहिजे. कारण मन-बुद्धी चालवणारी तीच शक्ती आहे. ही शक्ती जाणण्यासाठी कितीही उपदेश ऐका, वाचन करा वा प्रयत्न करा, तुम्हाला ती जाणता येणार नाही. वा त्याचा अनुभव येणार नाही. नानक, कबीरासारखे संत याच शक्तीबद्दल बोलले. हा एक तुमच्या आतमधला अनुभव आहे. म्हणून वर म्हटल्याप्रमाणे कोलंबसला हिंदुस्थान सापडला नाही. याचा अर्थ हिंदुस्थान नव्हता असा नाही किंवा त्याच्याकडे काही कमी होते असा ही नाही. त्याच्यानंतर ज्यांना

त्याचा शोध लागला त्यांनाही हिंदुस्थानात काही कमी होते हे दाखवायचे नव्हते. तुम्ही अलग-अलग होऊन याचा विचार केलात तर मी काय म्हणते हे तुमच्या लक्षात येणार नाही. मानवाचा हा शोध जन्म जन्मांतरापासून चालत आला आहे. वास्तविक जन्म-मृत्यू हे एक प्रकारचे जाणे-येणे आहे, हिंदू-मुस्लिम वगैरे सारखे वाद फक्त राजकारण म्हणून चालतात.

सहजयोग हे काही राजकारण नाही. पूर्वजन्मी हिंदू हिंदूच होते किंवा मुसलमान मुसलमानच होते असेही नाही. म्हणून हा शोध त्या स्तरावरच झाला पाहिजे. म्हणजे खरा अनुभव येईल. ही सूक्ष्म स्तरावर घडणारी घटना आहे हे नीट लक्षात घ्या. जे सूक्ष्म आहे, तरल आहे त्याचा जडाशी काही संबंध नसतो. परमात्मा खरं पाहिलं तर काहीच देत नाही; तुम्हाला घर, जमीन-जुमला, कुटुंब असल्या गोष्टीही परमात्मा देत नाही; त्यामध्ये परमात्म्याला काही स्वारस्य नाही. म्हणजे परमात्म्याला समजून घेण्यात आपण काही तरी चूक करत असतो. जे परम आहे त्याला परम राहण्यातच रस असतो हे नीट लक्षात घ्या. परमतत्त्व मिळवण्यासाठी कुंडलिनी-योग आवश्यक आहे अशी एक समजूत आहे. पण ज्यांना सिद्धी प्राप्त झाली त्यांना कुंडलिनी-जागृतीतूनच ती मिळाली हे मात्र खरे आहे. परमतत्त्वाशी योग होणे महत्वाचे आहे.

कुंडलिनी तुमची आई आहे; ती फक्त तुम्हाला पुनर्जन्म देते; तुम्ही जे काही बुद्धीमधून मिळवले आहे त्यापेक्षाही ती अधिक समजदार आहे. ती प्रेमाचा सागर आहे; तुम्हाला चुकीच्या मार्गाकडे ती येऊच देणार नाही तिची सर्व रचना परमात्म्याने खूप कुशलतेने केली आहे. बालक जन्माच्या आधी मातेच्या उदरात असतो तेव्हा जडतत्त्वाकडून त्याचे मन-बुद्धी-अहंकार इ. तयार होतात, पण त्यामध्ये जो प्रकाश येतो तो मस्तकातील ब्रह्मरंध्रातून येतो आणि शेवटी मणक्याच्या शेवटच्या त्रिकोणाकार अस्थीमध्ये स्थिराऊन तीन नाडी-संस्था तयार होतात. त्रिकोणाकार अस्थीमधील शक्ती हीच कुंडलिनी. या शक्तिबद्दल खूप लिहिले गेले आहे. पण ती जागृत होणे हा भाग महत्त्वाचा आहे. कुण्डलिनी जागृत होण्याची मुख्य खूण म्हणजे आपली बुबुळे मोठी होणे. ही स्पंदनाकार जागृत होत असल्यामुळे शास्त्रीय उपकरणांवर दिसू शकते. ते तुम्ही पाहू शकता व त्याची प्रचीती घेऊ शकता. कुंडलिनी जागृत झाल्यावरच तुम्ही पार होऊ शकता. अर्थात हे परमात्म्याची महाप्रेमशक्तीच करू शकते; जोपर्यंत ही प्रेमशक्ती मानवामध्ये उतरणार नाही तोपर्यंत कुंडलिनी उठणार नाही. विशेषत: नाभी व अनाहत चक्रांमधील पोकळीमधून हे कार्य झाल्याशिवाय कुंडलिनी उठणार नाही. त्याच्या आड येणारे हे अहंकार व प्रतिअहंकार तुम्हाला परमात्म्यापासून अर्थात स्व पासून दूर ठेवतात. हे सर्व मी कुणाच्या विरोधात बोलत आहे असे समजू नका.

आत्मसाक्षात्कार हा तुमचा पुनर्जन्म आहे हे लक्षात न घेता आत्मसाक्षात्कारानंतरही तुमचे चित्त व मागण्या तुमच्याच कुटुंबाच्या समस्यांमध्ये पैशामध्ये अडकून राहिले तर काय फायदा? तुमचे चित्त सतत चैतन्याबरोबर राहिले पाहिजे. असे लोक देवतास्वरूप वंदनीय आहेत; फालतू गोष्टी, वादविवाद करण्यात त्यांना रस नसतो; इथे नाव-पैसा-प्रसिद्धी अशा गोष्टी मिळवायच काम नाही. मनाचे परिवर्तन होणे एवढ एकच ध्येय आहे. कुंडलिनी तुम्हाला सर्व ताप-त्रास-आजारापासून मुक्त करते. सहजयोग हा कुंडलिनी -जागृतीचा आणि परमात्म्याशी योग करून देणारा मार्ग आहे. जे लोक पार झाले आहेत त्यांना विशेष सांगणे असे आहे की याचा जडाशी कधीही संबंध लावू नका; पुरी सतर्कता बाळगून आपणच आपल्या जीवनाचा विचार म्हणजेच सहजयोग करा.

भूतपिशाच्य करणाऱ्यांकडून तुम्हाला काहीही मिळणार नाही. तुमच्यामधील चेतना शुद्ध व पूर्णपणे जागृत व्हायला हवी व चैतन्याच्याच संपर्कात सर्वकाळ राहण्याचा प्रयत्न करा व तशी सवय लावा. कुंडलिनी जागृतीनंतर तुम्ही काहीतरी विशेष मिळवले पाहिजे. नेहमीचे कुटुंब, पैसा, संस्कार, वाद-विवाद सर्व सोडून द्या. परम मिळवण्यासाठी माणूस पूर्णपणे जागृत असयला हवा.

आज गुरुपोर्णिमेच्या शुभदिवशी 'मला'गुरू होण्याचा मान मिळाला. मातेला गुरू होणे अवघड आहे. कारण ती फक्त प्रेमस्वरूप आहे. मुलांचा गौरव यातच आनंद मिळवा. गुरूला तुम्ही काही देऊ शकत नाही. काही मागायचे असेल तर जे परम आहे ते मागा आणि हे प्रेम दूर दूरवर वाटा.

सर्वांना आनंत आशीर्वाद.

• • •

# विवाहापूर्वी नवरदेवांना श्रीमाताजींचा उपदेश गणपतीपुळे दि. २९डिसेंबर २००२

ईश्वरांचे तुम्हाला आशीर्वाद, आपण सर्व येथे विवाहासाठी मोठ्या संख्येने उपस्थित आहात याची मला अपेक्षा नव्हती. सहजयोगात तुम्हावर एक विशेष जबाबदारी आहे. लग्न करायच्या आधी विचार करा, लग्नानंतर तुम्ही वेडेवाकडे वागलात किंवा चुकीच्या गोष्टी केल्यात तर ती तुमची जबाबदारी आहे. तुमचे लग्न एकदा बरखास्त झाल्यावर सहजयोगात तुम्ही पुन्हा लग्न करू शकणार नाही. गणेशांच्या आशीर्वादासाठी तुम्ही योग्य असायला हवे. सर्वांनाच सहजयोगात लग्न करता येत नाही. मूर्खपणाच्या सर्व कल्पनांना दूर करा. तुमची वर्तणूक चांगली असेल, उत्तम चारित्र्याचे असाल तरच सहजयोगात लग्न करा. तुमचे तुमच्या पत्नीवर पूर्णतया प्रेम असावे, पूर्ण विश्वास असावा व जे जे शक्य आहे ते तुमच्या क्षमतेप्रमाणे तिला द्या.

तुमचे संबंध योग्य ठेवा. सहजयोगात लग्न होणे साधे नाही. तो तुमचा मोठा आधार असेल व ते माझे आशीर्वाद असतील. जर तुम्ही कमकुवत, क्षुद्र वृत्तीचे व त्रासदायक वागाल तर तुमचे लग्न मोडेल आणि मग सहजयोगाच्या बाहेर फेकले जाल. तर आत्ताच काय ते ठरवा. निश्चयी व्हा. आधीच विचार करा व उत्तम पती व्हायचे ठरवा. पत्नीची व कुटुंबाची काळजी घ्या व सहजयोग अंगी बाणा.

आजचा सोहळा तुम्हाला व आम्हा सर्वांना एक विशेष असा आहे., इतर लग्नासारखा नाही.तुम्हाबद्दल जे ठरविले त्याचा स्वीकार करा, मान्यता द्या, सहजयोगातील काही विवाहच बाद ठरले, ते पूर्णतया बरबाद झालेत. तर सहजयोगात परिपक्व व्हा आणि आदर्श कुटुंब प्रस्थापित करा, सुयोग्य पती व्हा. आपल्यात अनेक विशेष व्यक्तीमत्त्वाचे व विशेष नातेसंबंधाचे लोक आहेत. सहजयोगातील लग्न हे इतर बाहेरील लोकांसारखे मूर्खपणाच्या कल्पनांसारखे नाही. याबाबत तुम्ही स्वत: विषयी ठाम असा आणि सहजयोगातील लग्ने म्हणजे विशेष आहे हे इतरांना दाखवा, ती आदर्श ठरावीत, तसे तुम्ही वचनबद्ध रहा.

आपणा सर्वांना धन्यवाद.

● ● ●

## दसरा

रविवार, २१ ऑक्टोबर २००७

आजच्या दिवशी आम्ही दसऱ्याचा उत्सव श्रीमाताजींच्या प्रत्यक्ष सहवासात साजरा केला. या दिवशीच प्रभू श्रीरामचंद्रांने दुष्ट राक्षस रावणाचा नाश केला होता. श्रीमाताजींनी दसऱ्याबद्दल खूपच चांगल्या गोष्टी सांगितल्या. तसेच श्रीमाताजींनी आम्हा सर्वांना व जगातील सर्व सहजयोग्यांना आशीर्वाद दिले. त्यावेळी आम्ही सर्वजण खूप खूप आनंदी होतो. सर्वांच्या चेहऱ्यावर तो आनंद, उत्साह झळकत होता.

।। तरी न्यून ते पुरते । अधिक ते सरते ।। करुनी घेयावे हे तुमते । विनवितु असे ।।

## दिवाळी धनत्रयोदशी पूजा, दि. ७ नोव्हेंबर २००७









## श्री माताजींचे ऑस्ट्रेलियातून भारताकडे प्रस्थान





## निर्मल प्रेम आश्रम, श्री माताजींची भेट, दि. २२ नोव्हेंबर २००७









## पुस्तक प्रकाशन समारंभ-दिल्ली, दि. १७ नोव्हेंबर २००७

